# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-६०३/२०१९
दिनांक : ११/०२/२०२० 2247

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.

**विषय :** Wall being constructed next to the Mangroves...

**संदर्भ :** १. मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांचेकडील दिनांक ०५/०८/२०१९ रोजीच्या ई-मेल संदेशान्वये श्री. स्टॅलीन डी. यांची तक्रार.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पुर्व उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/ पू.उ./टे-१/कावि-९४८/२०१९ दिनांक २३/१२/२०१९.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक- 4619
दिनांक- 12/02/2020.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

उपरोक्त विषयांकित प्रकरणाबाबत संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये श्री. स्टॅलीन डी. यांची कांदळवन ऱ्हासाबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करणेकामी कळविलेनूसार उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांनी त्यांचेकडील दिनांक २३/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहेत.

Steno.

सदर प्रकरणी तहसिलदार कार्यालय कुर्ला यांचेमार्फत दिनांक ०६/१२/२०१९ रोजी स्थळपाहणी आयोजित करणेत आलेली होती. सदर तक्रारींत नमूद केलेनूसार तक्रारदार यांनी दाखविलेल्या जागेची स्थळपाहणी केली असता, सदर जागेवर भिंत बांधण्याचे काम चालू आहे. याबाबत वनपाल यांना विचारणा केली असता, सदर भिंतीचे बांधकाम वन विभागामार्फत चालू असल्याचे समजले. प्रकरणी तक्रारदार यांचा जबाब नोंदविला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, सदर भिंतीचे काम वन विभागामार्फत होत असल्याचे समजले असून त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसून त्यांनी त्यांची तक्रार मागे घेतली आहे. त्यांचे म्हणणेनूसार सदर भिंतीमूळे तिवरांच्या झाडांचे नुकसान होऊ नये व यापुढे सदर झाडांचे संरक्षण करावे, असे जबाबात नमूद केले आहे.

DCF(M)

सदर प्रकरणी कोठेही कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही. प्रकरणी आपले माहितीसाठी उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल व इतर अनुषंगिक कागदपत्रे पृष्ठ क्र. १ ते ०६ माहितीस्तवर सविनय सादर.

13/3

( वंदना मकू )
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत :** मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, यांना माहितीसाठी सादर.

# उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

निळकंठ बिझनेस पार्क, ए बिल्डींग, तळ मजला, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई-४०००८६

ई मेल-sdoeasternsuburban@gmail.com दुरध्वनी क्रमांक : २५११११२६


अमंड/१९/३९७४०/क.अधि.
३१.१२.१९

क्र. उविअ/पू.उ/टे-१/कावि-१४८/२०१९
दिनांक :- २३.१२.२०१९ जा.क्र. ७८०

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

अ. नि
२३/१२

विषय : Wall being constructed next to the Mangroves...

संदर्भ : १) आपले कार्यालयाकडील पत्र क्र:सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-६०३/२०१९ दि.०९/०९/२०१९ जा.क्र.१०६०७
२) तहसिलदार कुर्ला यांचेकडील पत्र क्र. तह कुर्ला/जमीन/कावि-१४१/२०१९ दि. ०९.१२.२०१९

मा महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र. १ समवेत प्राप्त झालेल्या श्री. स्टॅलीन डी. यांनी मौजे विक्रोळी ते जे.व्ही.एम.आर. जंक्शन कांजूरमार्ग या ठिकाणी कांदळवन क्षेत्रामध्ये भिंत उभारल्याबावत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचेकडून संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालानुसार पुढीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

दि. ०६/१२/२०१९ रोजी तक्रारदार यांनी दाखविलेल्या जागेची संयुक्त स्थळपाहणी केली असता सदर जागेवर भिंत बांधण्याचे काम चालू असल्याचे नमूद केले आहे. याबाबत वनपाल यांना विचारले असता भिंतीचे बांधकाम वन विभागामार्फत चालू असल्याचे समजते. प्रकरणी तक्रारदार यांचा जबाब नोंदविला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, सदर प्रकरणी भिंतीचे काम वन विभागामार्फत होत असल्याचे समजले असून त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसून त्यांनी त्यांची तक्रार मागे घेतली. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर भिंतीमुळे तिवरांच्या झाडांचें नुकसान होऊ नये व यापुढेही सदर झाडांचे संरक्षण करावे.

सोबत तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचा संदर्भ क्र. २ वर नमूद अहवाल, संयुक्त स्थळपाहणी पंचनामा व तक्रारदार यांचा जबाब जोडला आहे. प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

उप विभागीय अधिकारी
पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा

10C

सोबत- पृष्ठांक ०१ ते ५

27/12/19
लिपिक
जिल्हाधिकारी
उपनगर जिल्हा

# तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई 400080
फोन. :- 25602386 email- tahsildarkurlaest@gmail.com

क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-949/2019 दि.09/12/2019

प्रति,
उपविभागीय अधिकारी,
पूर्व उपनगरे.

विषय:- Wall being constructed next to the Mangroves..

संदर्भ:- मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र.सी/कार्या-2 आय/टे-8/कावि-603/2019 दि.09/09/2019.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री. स्टॅलीन डी यांनी मौजे-विक्रोळी ते जे.व्ही.एल.आर जंक्शन कांजुरमार्ग या ठिकाणी कांदळवन क्षेत्रामध्ये भिंत उभारल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे या कार्यालयास निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने मंडळ अधिकारी, घाटकोपर, तलाठी भांडुप, परिरक्षण भुमापक, वनपाल व तक्रारदार यांचे सह संयुक्त स्थळपाहणी करुन पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

दि.06/12/2019 रोजी तक्रारदार यांनी दाखविल्याप्रमाणे जागेची संयुक्त स्थळपाहणी केली असता सदर जागेवर भिंत बांधण्याचे काम चालु असल्याचे दिसले. याबाबत वनपाल यांना विचारले असता भिंतीचे बांधकाम वन विभागामार्फत सुरू असल्याचे सांगितले. प्रकरणी तक्रारदार यांचा जबाब नोंदविला असुन त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, सदर प्रकरणी भिंतीचे काम वन विभागामार्फत होत असल्याचे समजले असुन त्याबाबत माझी कोणतीही तक्रार नसुन मी माझी तक्रार मागे घेत आहे. फक्त भिंतीमुळे तिवरांच्या झाडांचे नुकसान होवु नये व यापुढेही त्यांचे संरक्षण करावे. याप्रमाणे जागेची सद्यस्थिती आहे.

सोबत मंडळ अधिकारी, घाटकोपर यांचा अहवाल, संयुक्त स्थळपाहणी पंचनामा व तक्रारदार यांच्या जबाबासह प्रस्तुत प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

(संदीप थोरात)
तहसिलदार कुर्ला
(मुलुंड)

OFFICE OF THE
SUB-DIVISIONAL OFFICER
Eastern Suburban
Mumbai Suburban District
Inward No. 1595
Date 18/12/2019
Comp...
A.K. N.T. S.D.O. E.S. M.S.D.

# मंडळ अधिकारी घाटकोपर व तलाठी यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज कंपाउंड, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई 400080

क्र.मं.अ/घाटकोपर/जमीन/वा.क्र.3५/2019
दि.06/12/2019

मा.तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे हुजूरास
सविनय अहवाल सादर.

विषय:- Wall being constructed next to the Mangroves..

संदर्भ:- 1) मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र.सी/कार्या-2 आय/टे-8/कावि-603/2019 दि.09/09/2019.
2) आपलेकडील पत्र क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-949/2019 दि.03/12/2019

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, श्री.स्टॅलीन डी यांनी मौजे-विक्रोळी ते जे.व्ही.एल.आर जंक्शन कांजुरमार्ग या ठिकाणी कांदळवन क्षेत्रामध्ये भिंत उभारल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे. नायब तहसिलदार तथा पथक प्रमुख तालुका स्तरीय सागर तटीय सनियंत्रण समिती, तहसिलदार कुर्ला यांचेकडील संदर्भि पत्र क्र.2 नुसार दि.06/12/2019 रोजी दुपारी 02.30 वा संयुक्त जागा पाहणी व चौकशी करणेकामी तलाठी कांजुर, तलाठी भांडुप, नगर भुमापन कार्यालय, मुलुंड मधील परिरक्षण भुमापक, वनपाल व तक्रारदारासह जागेवर उपस्थित राहीलो. तक्रारदार यांनी दाखविल्याप्रमाणे जागेची स्थळपाहणी केली असता सदर जागेवर भिंत बांधण्याचे काम चालु असल्याचे दिसले. सदर बाबत वनपाल यांना विचारले असता भिंतीचे बांधकाम आमच्या विभागामार्फत सुरू असल्याचे सांगितले. याबाबत तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी दिलेल्या जबाबात नमुद केले आहे की, सदर प्रकरणी माझी कोणतीही तक्रार नसुन माझी तक्रार मागे घेत आहे. फक्त भिंतीमुळे तिवरांच्या झाडांचे नुकसान होवु नये व त्यांचे संरक्षण करावे. याप्रमाणे जागेची सद्यस्थिती असुन सोबत तक्रारदार यांचा जबाब सादर करीत आहे.

मंडळ अधिकारी घाटकोपर
(मुलंड)

तलाठी भांडुप

तलाठी कांजुर

NEW\Kandalvan\Circle Ghatkopar\Stalin D-949.docx

श्री.पी.एन.राऊत
प.भू.१०

मंडळ अधिकारी घाटकोपर व तलाठी कांजूर यांचे समोर जबाब

लिहून देणार श्री. स्टॅलिन डी वय वर्षे व्यवसाय

राहणार- पवार हाऊस, भांडुप गाव, भांडुप (पूर्व) मुंबई नं. ४२

आज रोजी समक्ष हजर राहून जबाब लिहून देतो की —
जे. व्ही. एल. आर जंक्शन दि. ५/०४/२०१९ रोजी मौजे विक्रोळी ते कांजूर मार्ग या ठिकाणी कांदळवन क्षेत्रामध्ये भिंत उभारल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे. त्या अनुषंगाने मा. नायब तहसिलदार तथा पथक प्रमुख तालुका स्तरीय सागर तटीय संनियंत्रण समिती तहसिल कुर्ला यांनी पत्र क्र. तह/कुर्ला/जमिन/कावि-८९/२०१९ दि. ३/१२/२०१९ ने संयुक्त जागा पाहणी व चौकशी करणेसाठी दि. ०६/१२/२०१९ रोजी दुपारी 2.30 वाजता सदर जागेवर राहणेस कळविले होते. त्याप्रमाणे मी दि. ५/१२/२०१९ रोजी जागेवर हजर होतो. त्यावेळेस मंडळ अधिकारी घाटकोपर, तलाठी कांजूर, तलाठी भांडुप, नगर भूमापन कार्यालयातील कर्मचारी (भूमापक) व वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते. मी केलेल्या तक्रारी बाबत चौकशी केली असता सदरची भिंत वनविभाग तर्फे बांधण्यात येत आहे असल्याचे कळाले. त्यामुळे त्याबाबत आता माझी भिंती संबधी तक्रार नाही. मी माझी तक्रार मागे घेत आहे. हा लिहून दिलेला जबाब मला वाचून दाखविला व समजावून सांगितला तो बरोबर असून मला मान्य आहे. भिंतीमुळे व इतर कशामुळे मॅन्ग्रोजच्या झाडाना त्रास होता कामा नये आणि पाणी सुद्धा वेळेवर मिळाले पाहीजे.

दि. ०५/१२/२०१९

समक्ष

(स्वाक्षरी)

मं. अ. घाटकोपर

(स्वाक्षरी)

5/12/2019

(स्वाक्षरी)

तलाठी भांडूप

तलाठी कांजूर